महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद नागपूर
कार्यालय दुरध्वनीक्रमांक ०७१२-२५६४८४३, ५६०६५ ई-मेल-dhonagpur2019@gmail.com

आझादी का अमृत महोत्सव

जाहीरात

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

वॉक इन इंटरव्ह्यूव्दारे तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत.

## थेट मुलाखत

मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षेखाली गठीत करण्यांत आलेल्या निवड समितीव्दारे आरोग्य सेवा, या सवर्गातील नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या आयुर्वेदिक / ॲलोपॅथिक / फिरते पथक इ. येथिल गट ब रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे ११ महिण्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

सदर वॉक इन इंटरव्ह्युसाठी www.nagpurzp.com या संकेत स्थळावर जाऊन अर्ज करणे अनिवार्य आहे. ऑनलाईन अर्ज सादर न करणा-या उमेदवारांना वॉक इन इंटरव्ह्यु च्या प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही व त्यांचे म्हणणे कुठल्याही प्रकारे विचारात घेतले जाणार नाही.

ऑनलाईन अर्जाकरीता www.nagpurzp.com या वेबसाईटवर जाऊन अर्ज करावा. अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक २९.१०.२०२६ सकाळी १० वाजता पासून सुरु होऊन दिनांक १३.११.२०२६ सायं.६.०० वाजेपर्यंत सुरु राहील. दिनांक १३.११.२०२६ ला सांय.६.०० वाजता नंतर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची लिंक बंद होईल याची नोंद घ्यावी.

उमेदवारांची मुळ प्रमाणपत्र तपासणी करीता दिनांक १६.११.२०२६ ते दि.२०.११.२०२६ रोजी आबासाहेब खेडकर सभागृह,जि.प. नागपूर येथे खालील वेळापत्रकाप्रमाणे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| तारीख | अर्ज क्रमांक | वेळ |
|---|---|---|
| दिनांक १६.११.२०२६ | १ ते १०० | सकाळी १० ते २ पर्यंत |
| दिनांक १७.११.२०२६ | १०१ ते २०० | सकाळी १० ते २ पर्यंत |
| दिनांक १८.११.२०२६ | २०१ ते ३०० | सकाळी १० ते २ पर्यंत |
| दिनांक १९.११.२०२६ | ३०१ ते ४०० | सकाळी १० ते २ पर्यंत |
| दिनांक २०.११.२०२६ | ४०१ ते ५०० | सकाळी १० ते २ पर्यंत |

सर्व उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र तपासणी झाल्यानंतर तात्पुरती गुणवत्ता यादी दि.२३.११.२०२६ वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल. आक्षेपाकरीता दिनांक २३.११.२०२६ ते २५.११.२०२६ दुपारी १२.०० वाजेपर्यंत वेळ देण्यात येईल. आक्षेप टंक ब्बचल मध्ये पुराव्यासह सादर करणे बंधनकारक राहील. अंतिम गुणवत्ता यादी दि.२५.११.२०२६ ला संध्याकाळी ६.०० वाजता संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

दिनांक २६.११.२०२६ ला समुपदेशन प्रक्रिया राबविण्यात येईल. गुणवत्ता यादीतील अ.क्र.१.ते १०० यांनी दिनांक २६.११.२०२६ रोजी सकाळी १० वाजता आरोग्य विभाग जिल्हा परिषद नागपूर येथे उपस्थित राहावे.

**आवश्यक दस्तऐवज / सुचना -**

१) बी.ए.एम.एस.पदव्युत्तर पदवी / पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका(ऑनलाईन अर्ज भरतांना फक्त अंतीम वर्षाचे गुण नमुद करावे)
२) पदविका / पदवी प्रमाणपत्र /पदव्युत्तर पदवी प्रमाणत्र
३) वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र वैध तसेच नियमित नोंदणी प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
४)पदव्युत्तर पदवी ग्राहय धरण्यासाठी नोंदणी प्रमाणपत्रावर Additional Qualification अदयावत असणे अनिवार्य आहे.
५) वयाबाबत प्रमाणपत्र (टि.सी./जन्म प्रमाणपत्र)
६) शासकीय सेवेचा अनुभव प्रमाणपत्र
  १) सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र हे नियुक्ती प्राधिकारी यांची स्वाक्षरी असलेले ग्राहय धरण्यात येईल (मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/ जिल्हा शल्य चिकित्सक /जिल्हा आरोग्य अधिकारी / वैद्यकिय अधिकारी आरोग्य मनपा/ नियुक्ती प्राधिकारी इ.)
  २)तालुका आरोग्य अधिकारी किंवा वैद्यकीय अधिक्षक यांचे स्वाक्षरी असलेले अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी
७) अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो
८) आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकिंत प्रतीचा एक संच
९) फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेवून येणे आवश्यक आहे.
१०) उमेदवारांचे वय ५७ वर्षापेक्षा जास्त नसावे.
११) नागपूर जिल्हात सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी वैदयकिय अधिकारी यांना वैदयकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र व तालुका आरोग्य अधिकारी यांचे Performance report अनुकूल असणे अनिवार्य राहील.
१२) जिल्हयामधील /जिल्हयाबाहेरील ज्या उमेदवारांविरुध्द तक्रारी असेल, मुळ कामावरुन कमी करण्यात आले असेल अश्या उमेदवारांचे पात्र उमदेवारांच्या यादीत नाव समाविष्ट करण्यात येणार नाही.
१३) अनधिकृत गैरहजर असलेल्या /संपामध्ये सहभागी असलेले / शासन सेवेत शिस्त भंग कार्यवाहीकरिता काढून टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.
१४) कुठल्याही राजकिय पक्षाचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष शिफरस /दबाव आणल्यास पूर्वसुचना न देता सदर उमेदवारास अपात्र घोषीत करण्यात येईल तसेच कामावरुन कमी करण्यात येईल.
१५) समुपदेशनाच्या वेळी समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम निर्णय राहील.
१६) गुणवत्ता यादीतील उर्वरीत उमेदवारांना पुढील १ वर्षापर्यंत प्रतीक्षा यादीत समाविष्ट करण्यात येईल व वेळोवळी रिक्त होणा-या पदावर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना घेण्यात येईल.

सदर बी.ए.एम.एस.पदाकरीता रुपये ४०,०००/- एवढे मानधन राहील

( राजकुमार गहलोत )
सदस्य सचिव,निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर